# नागपूर सुधार प्रन्यास

स्टेशन रोड, सदर, नागपूर–४४०००१, www.nitnagpur.org

## जाहिरात

नागपूर सुधार प्रन्यासमध्ये खालील नमुद केल्यानुसार सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने नेमणूक करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | आवश्यक अनुभव |
|---|---|---|---|
| १. | सहाय्यक अभियंता श्रेणी – १ (स्थापत्य) | ०२ | गुंठेवारी अधिनियमातंर्गत अनधिकृत अभिन्यास मंजुरीची तसेच त्यामधील भुखंड नियमितीकरणाची प्रकरणे/इमारत बांधकाम नकाशा तपासणी इत्यादी हाताळण्यासंबंधाने किमान सहाय्यक अभियंता श्रेणी–१ (स्थापत्य) या पदाचा पुरेसा अनुभव. |
| २. | सहाय्यक अभियंता श्रेणी – १ (विद्युत) | ०१ | शासकीय/निमशासकीय कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या प्रकल्पातील आंतर/बाह्य विद्युतीकरणाचे कामे, प्राकलन तयार करणे तसेच ट्रान्सफार्मर, स्ट्रीट लाईट इत्यादी तसेच हॉट मिक्स प्लॅन्ट दुरुस्ती व देखभाल करण्याचा सहाय्यक अभियंता श्रेणी–१ (विद्युत) या पदाचा पुरेसा अनुभव. |
| ३. | सहाय्यक कार्यकारी अधिकारी | ०१ | जमीन/न्यायालयीन/भूखंडवाटप/गाळा/दुकाने व घरकुल लिलाव तथा सोडतद्वारे तसेच लिजबाबत इत्यादि कामाचा पुरेसा अनुभव. |
| ४. | सहाय्यक अभियंता श्रेणी–२ (स्थापत्य)/ शाखा अभियंता (स्थापत्य)/ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ०४ | गुंठेवारी अधिनियमातंर्गत अनधिकृत अभिन्यास मंजुरीची तसेच त्यामधील भुखंड नियमितीकरणाची प्रकरणे/इमारत बांधकाम नकाशा तपासणी इत्यादी हाताळण्यासंबंधाने पुरेसा अनुभव. |
| ५. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ०७ | गुंठेवारी अधिनियमातंर्गत अनधिकृत अभिन्यास मंजुरीची तसेच त्यामधील भुखंड नियमितीकरणाची प्रकरणे हाताळण्यासंबंधाने पुरेसा अनुभव. |
| ६. | लिपीक | ०६ | लेखा/न्यायालयीन/आस्थापना/जमीन/भूखंड/गाळा/दुकाने व घरकुल लिलाव/निविदा तथा सोडत द्वारे वाटपाचा तसेच लिजबाबत इत्यादि कामाचा पुरेसा अनुभव. |
| ७. | लघुलेखक | ०१ | मराठी १०० श.प्र.मि. लघुलेखन गति आणि मराठी ३० श.प्र.मि. व इंग्रजी ४० श.प्र.मि. टंकलेखनाची गति तसेच लघुलेखक/टंकलेखनाचा पुरेसा अनुभव आवश्यक. |
| ८. | यांत्रिकी | ०१ | शासकीय/निमशासकीय कार्यालयात यांत्रिकी पदावर तसेच हॉट मिक्स प्लॅन्टमध्ये काम केल्याचा पुरेसा अनुभव. |
| ९. | फेरो अटेंडंट/चपराशी/ कुली | ०१ | शासकीय/निमशासकीय कार्यालयात फेरो प्रिंटर हाताळण्यासंबंधाने पुरेसा अनुभव. |

१) अर्जदार शासकीय/निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेला असावा. २) वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत. ३) अर्जदाराविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी चालू/प्रलंबित तथा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. तसेच फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. ४) कर्मचारी शासकीय/निमशासकीय सेवेमधुन सेवानिवृत्त झालेला असावा, जाहिरातीमध्ये नमुद पदाच्या कामाचा पुरेसा अनुभव असावा, तो शारीरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.

**सदर नेमणूकीचा कालावधी प्रथमत:** ११ महिन्यांचा राहील. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०१५/ प्र. क्र. १००/१३ दि. १७/१२/२०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण–२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. २१/०२/२०१८ च्या तरतुदीनुसार करार पध्दतीवरील नेमणूकीच्या वेळी महागाई भत्तासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतना एवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्ती वेतन वगळून) मासिक परिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल आणि एकदा निश्चित करण्यात आलेले परिश्रमिक करार पध्दतीने नेमणूकीच्या कालावधीसाठी कायम राहील. तसेच करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशाबाबत/सामावून घेण्याबाबत व नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क राहणार नाहीत. आवश्यकतेनुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या कमी/अधिक करण्याचे तसेच नेमणूक रद्द करण्याचे अधिकार मा. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांना राहतील.

वरील अर्हताप्राप्त सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज आस्थापना विभाग, मुख्य कार्यालय, नागपूर सुधार प्रन्यास सदर, नागपूर–४४० ००१ यांचेकडे दि. २०/०१/२०२३ पर्यंत पुर्ततासह सादर करावेत. या तारखेनंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. सहाय्यक अभियंता श्रेणी – १ (स्थापत्य), सहाय्यक अभियंता श्रेणी – १ (विद्युत), सहाय्यक कार्यकारी अधिकारी, सहाय्यक अभियंता श्रेणी–२ (स्थापत्य)/शाखा अभियंता (स्थापत्य)/कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, लिपीक, लघुलेखक, यांत्रिकी तथा फेरो अटेंडंट/ चपराशी/कुली या पदासंबधाने अर्जासोबत अर्जदाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो, सेवानिवृत्तीच्या वेळचे वेतन, पीपीओ आदेशाची प्रत निवृत्तीवेतनाचे साक्षांकीत कागदपत्रे व कामाच्या अनुभवाचे सक्षम प्राधिकाऱ्याकडील प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

__टिप:–__ उपरोक्त जाहिरातीमध्ये नमुद पदे कमी जास्त करण्याचे तथा आवश्यकतेनुसार नियुक्ती करण्याचे अधिकार राखीव ठेवलेले आहेत. याबाबतचा अंतिम निर्णय नासुप्रचा राहील. व सदर निर्णय अर्जदारास बंधनकारक राहील.

**जाहिरात क्र. का.अ./५६/२०२२–२३**
**दिनांक : ०५.०१.२०२३**

**महाव्यवस्थापक**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर**

Adda247 मराठी